**MHKO120001242022**

# निशाण क्रमांक ०५ वरील आदेश.

( राजाराम गुरव वि. ग्रामसेवक, दिंडेवाडी वगैरे )

वादीने सदर अर्ज प्रतिवादी विरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १, २ अन्वये तूर्तातूर्त मनाईकरिता दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन :-**

०२. मौजे दिंडेवाडी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील,

| अ.क्र. | भूमापन गट क्र. | क्षेत्र हे. आर.पॉ. | आकार रू. पै. | पैकी हे. आर. पॉ. |
|---|---|---|---|---|
| १. | ९७८ | ०-१८-०० | ०-३१ | ०-०९-०० |

त्याची चतुःसीमा पूर्वेस - याच मिळकतीमधील वादीचे घर व रिकामी जागा, पश्चिमेस – नंदकुमार इंदुलकर यांची मिळकत, दक्षिणेस - याच गटातील सहहिस्सेदारांची मिळकत, उत्तरेस - वादीच्या मिळकतीमधील ग्रामपंचायतीची

**थोडक्यात वादीचे कथन पुढील प्रमाणे,**

०३. दावा मिळकत ही वादीची वडिलार्जित मालकी वहिवाटीची असून तशी दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद आहे. प्रतिवादींचा दावा मिळकतीशी कोणत्याही प्रकारे संबंध नाही. असे असताना राजकीय द्वेषातून प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीमध्ये अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम करण्याचा विचार करत आहेत. या बाबत दिनांक १६/०२/२०२२ रोजी वादींनी प्रतिवादींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, प्रतिवादींनी राजकीय सत्तेचा दुरूपयोग करून दिनांक २२/०२/२०२२ रोजी दावा मिळकतीमध्ये अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाची आखणी सुरू केली आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत दावा दाखल केला आहे व दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो यातील प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करू नये व

वादीच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश पारित होण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादींनी निशाणी क्रमांक १९ वर तूर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. थोडक्यात प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी बांधकाम करत असलेली मिळकत ही वेगळी आहे. तसेच, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी सन २०२०-२१ मध्ये दिंडेवाडी गावासाठी अंगणवाडी क्र.११ साठी इमारत मंजूर केल्याने व ग्रामपंचायत दिंडेवाडीचे मासिक सभा दिनांक ३१/०७/२०२१ ठराव क्र.०९ ने ग्रामपंचायतीच्या मालकी वहिवाटीच्या ग्रामपंचायत मिळकत क्र.०५ मध्ये सदर अंगणवाडीचे बांधकाम करण्याचे ठरले होते. सदर बाबीस जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिनांक २४/०२/२०२१ रोजीच्या पत्राने मान्यता दिलेली आहे. तसेच सदरचे बांधकाम हे प्रतिवादींच्या अखत्यारीत येत नाही याची माहिती वादीला आहे. केवळ, लोकोपयोगी कामाचे श्रेय प्रतिवादींना मिळू नये या कारणासाठी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आला असल्यामुळे तो खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०५. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. बी. पाटील, तसेच प्रतिवादींतर्फे विधिज्ञ एस. के. देसाई यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील परिस्थितीचे अवलोकन केले असता, खालील प्रश्नबिंदू माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिद्ध करतात काय ? | : | नकारार्थी. |
| २. | सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | : | नकारार्थी. |
| ३. | प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल काय ? | : | नकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

# कारणमिमांसा

०६. वादीने त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.०३ सोबत, दावा मिळकतीचा ७/१२ उतारा प्रत, ८-अ उतारा प्रत, सिटी सर्व्हे चा नकाशा प्रत, तक्रार अर्जाची प्रत व दावा मिळकतीचे फोटो हजर केले आहेत. तसेच निशाणी क्र.११ सोबत बांधकामांचे फोटो हजर केले आहेत. तसेच, निशाणी क्र.२२ सोबत घरठाण उताऱ्यांच्या प्रती व फोटो दाखल केला आहेत. तसेच त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ धनाजी रामचंद्र ढेकळे यांचे प्रतिज्ञापत्र हजर केले आहे.

०७. प्रतिवादींनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.१४ सोबत मालमत्ता क्र.०५ व १७ चा घरठाण उतारा प्रत, जिल्हा परिषद यांचा मान्यता आदेशाची प्रत हजर केली आहे. तसेच, निशाणी क्र.२१ सोबत कारणापुरता उतारा प्रत, प्रशासकीय आदेशांच्या प्रती, घरठाण उताऱ्याच्या प्रती हजर केल्या आहेत.

## प्रश्नबिंदु क्रमांक १ करिता, (प्रथमदर्शनी केस)

०८. सकृतदर्शनी केस बघताना न्यायालयास एक गंभीर व प्रामाणिक वाद दाव्याच्या न्यायचौकशी करिता उपस्थित करण्यात आला आहे काय? हे तपासावे लागते. सकृतदर्शनी केस सिद्ध करण्याकरिता वादीस दाव्याच्या गुणदोषांवर सिद्ध करावयाची केस सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत अर्जावर विचार करताना न्यायालय अभिलेखावर दाखल शपथपत्र व इतर कागदोपत्री पुरावा त्यांच्या औपचारिक सिद्धतेशिवाय विचारात घेवू शकतो.

०९. वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, गट क्र.९७८ हा वादी व इतर सहहिस्सेदार यांच्या मालकीचा असून त्यांच्या व सहहिस्सेदार श्री. इंदुलकर यांच्यामध्ये वाटप झालेले आहे. प्रतिवादींचा वादीच्या मिळकतीशी कोणताही संबंध नाही. परंतु, प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे वादीच्या मालकीच्या जागेमध्ये अतिक्रमण करून अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम करत आहेत. याउलट, प्रतिवादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे ग्रामपंचायतीच्या मालकी वहिवाटीच्या ग्रामपंचायत मिळकत क्र.०५

मध्ये कायदेशीर ठराव घेवून अंगणवाडीचे बांधकाम करत आहेत. सदरच्या अंगणवाडीचे बांधकाम हे जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या मार्फत होत आहे. वादींनी प्रस्तुत दाव्यामध्ये जिल्हा परिषद यांना आवश्यक पक्षकार केलेले नाही. सदरचे काम लोकहिताचे व लोकोपयोगी आहे.

१०. मान्य परिस्थितीनुसार वादीच्या कथनांनुसार प्रतिवादी हे गट क्र.९७८ मध्ये अतिक्रमण करून बांधकाम करत आहेत. याउलट, प्रतिवादींच्या कथनांनुसार ते ग्रामपंचायत मिळकत क्र.५ मध्ये बांधकाम करत असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, ग्रामपंचायत मिळकत क्र.५ ही गट क्र.९७८ मध्ये येते काय हे पहाणे गरजेचे आहे. सदरची वस्तुस्थिती ही फक्त मोजणीच्या आधारे निकाली होवू शकते. तसेच, गट क्र.९७८ ची संपूर्ण मोजणी केल्या शिवाय ग्रामपंचायत यांनी बेकायदेशीरपणे बांधकाम केले आहे किंवा नाही हे ठरवणे शक्य होणार नाही. मान्य परिस्थितीनुसार वादीने आपल्या मालकीच्या जागेमध्ये ग्रामपंचायतीने अतिक्रमण केल्याबाबत कोणत्याही कार्यालयाकडे गटाच्या मोजणीकरिता कोणताही अर्ज दिलेला नाही किंवा कोणत्याही खाजगी इसमांकडून तात्पुरत्या स्वरूपाची मोजणी सुद्धा करवून घेतलेली नाही. त्यामुळे, सकृतदर्शनी वादी हे त्यांची केस शाबीत करण्यास अपयशी ठरले आहेत. परिणामतः मी प्रश्नबिंदू क्र.१ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**प्रश्नबिंदु क्रमांक २ ते ४ बाबत, ( सोईचा समतोल, अपरिमित नुकसान व आदेश )**

११. प्रश्नबिंदू क्र.१ च्या निष्कर्षावरून माझे असे मत झाले आहे की, प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने केस नाही. त्यामुळे, सोईचा समतोल व अपरिमित नुकसानीची तत्त्व सुद्धा वादीच्या बाजूने नाही. तसेच, प्रतिवादी करत असलेले अंगणवाडीचे बांधकाम स्थगित केल्यास अनेक मुले त्यांच्या शिक्षणाच्या हक्कापासून वंचित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, प्रश्नबिंदू क्र. २ व ३ करिता मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो व न्यायाचे उद्दिष्ट साधण्याकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>.

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाचा आदेश मूळ दाव्यात समाविष्ट करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2022.04.16 17:18:22 +0530

स्थळ : गारगोटी. ( **व्ही. बी. मुल्ला** )
दिनांक : १६/०४/२०२२ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.